**( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )**

डब्ल्यूपी (सीआरएल.) 68/2016

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

**फौजदारी मूळ न्यायाधिकारक्षेत्र**

**रीट याचिका (फौजदारी क्रमांक ६८/२०१६**

युथ बार असोसिएशन ऑफ इंडिया — याचिकाकर्ते

विरुद्ध

भारतीय संघराज्य आणि इतर — प्रतिवादी

## आदेश

न्यादेश जारी करा.

२. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अंतर्गत दाखल केलेल्या या रिट याचिकेत, याचिकाकर्ते, युथ बार असोसिएशन ऑफ इंडिया यांनी , परमादेश रीट जारी करण्याची प्रार्थना केली आहे. ज्याद्वारे सर्व राज्यांच्या पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावर, भारताच्या राज्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये नोंदणीकृत असलेला प्रत्येक प्रथम माहिती अहवाल नोंदणी झाल्यापासून शक्य तितक्या लवकर, शक्यतो नोंदणीच्या वेळेपासून २४ तासांच्या आत अपलोड करण्याचे निर्देश देण्याची प्रार्थना केली आहे.

३. या न्यायालयाने रिट याचिकेवर सुनावणी केल्यानंतर, भारतीय संघराज्य आणि राज्यांना नोटीस बजावण्यात आल्या.

४.		याचिकाकर्त्याचे अधिवक्ता श्री. सनप्रीत सिंग अजमानी यांनी सादर केले आहे की प्रथम खबरी अहवालाची २ नोंदणी केल्यानंतर जर तो पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड केला गेला तर आरोपी व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना भेडसावणाऱ्या अनेक अनावश्यक समस्यांचे निराकरण होईल. विद्वान अधिवक्ता असा युक्तिवाद करतील की जेव्हा फौजदारी कायदा लागू होतो आणि एखाद्या व्यक्तीचे स्वातंत्र्य धोक्यात असते, तेव्हा त्याच्याकडे माहिती असली पाहिजे जेणेकरून तो त्याच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी आवश्यक पावले उचलू शकेल. या संदर्भात, त्यांनी पश्चिम बंगाल राज्य आणि इतर विरुद्ध कमिटी फॉर प्रोटेक्शन ऑफ डेमोक्रॅटिक राईट्स, वेस्ट आणि इतर (२०१० ) ३  एस. सी. सी. ५७१ मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयील एका परिच्छेदाकडे आमचे लक्ष वेधले आहे, ज्यामध्ये असे निरीक्षण नोंदवले गेले आहेः

> *" राज्यघटनेचे कलम २१ त्याच्या व्यापक दृष्टीकोनातून कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेनुसार वगळता व्यक्तींचे जीवन आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करते. या कलमाच्या व्यापक वापरात केवळ आरोपींच्या हक्कांचीच नव्हे तर पीडितेच्या हक्कांचीही अंमलबजावणी केली जाते. दखलपात्र गुन्ह्याचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीविरुद्ध न्याय्य आणि निःपक्षपाती चौकशीची तरतूद करणाऱ्या नागरिकाच्या मानवी हक्कांची अंमलबजावणी करणे हे राज्याचे कर्तव्य आहे, ज्यात त्याचे स्वतःचे अधिकारीहे  समाविष्ट असू शकतात. काही विशिष्ट परिस्थितींमध्ये गुन्ह्याचा साक्षीदारदेखील राज्याकडून संरक्षण मागू शकतो आणि त्याला संरक्षण दिले जाईल."*

५.		सोम मित्तल विरुद्ध कर्नाटक सरकार (२००८) ३ एस. सी. सी. ७५३  या प्रकरणात न्यायालयाने असा निकाल दिला आहेः

*"राज्यघटनेच्या कलम २१ अंतर्गत स्वातंत्र्याचा अधिकार हा एक मौल्यवान अधिकार आहे आणि त्यामुळे त्यात सहजपणे हस्तक्षेप केला जाऊ नये. प्रचंड ऐतिहासिक संघर्ष आणि बलिदानानंतर युरोप आणि अमेरिकेच्या लोकांनी तो प्राप्त केला . यावेळी चार्ल्स डिकन्स यांच्या 'अ टेल ऑफ टू सिटीज' या कादंबरीची आठवण होते , ज्यामध्ये डॉ. मॅनेट हे निर्दोष असले, तरी त्यांना एका फ्रेंच कुलीन व्यक्तीच्या केवळ खात्यांवर १८ वर्षे बॅस्टिलमध्ये कैदेत ठेवण्यात आले होते."*

६. डी. के. बासू विरुद्ध पश्चिम बंगाल (ए. आय. आर. १९९७ एस. सी. ६१०) मध्ये असे मत व्यक्त केले गेले आहे कीः

*राज्यघटनेच्या कलम २१ आणि २२ (१) मध्ये अंतर्भूत असलेल्या हक्कांचे काळजीपूर्वक आणि काटेकोरपणे संरक्षण करणे आवश्यक आहे. आपण ही समस्या टाळू शकत नाही. क्रूर, अमानवीय किंवा अपमानास्पद वागणुकीचा कोणत्याही प्रकारचा छळ, मग तो तपासादरम्यान, चौकशीदरम्यान किंवा इतर कोणत्याही प्रकारे झाला असो, तो घटनेच्या कलम २१ च्या प्रतिबंधाखाली येईल. जर शासनाचे पदाधिकारीच कायदा मोडणारे बनले, तर ते कायद्याचा अवमानच करतील व त्यामुळे अराजकतेला प्रोत्साहन मिळेल आणि प्रत्येक व्यक्तीमध्ये स्व-हितासाठी कायदा बनवण्याची प्रवृत्ती निर्माण होईल ज्यामुळे अराजकतावाद निर्माण होईल. कोणतेही सुसंस्कृत राष्ट्र असे होऊ देऊ देणार नाही. पोलीस एखाद्या व्यक्तीस अटक करतात त्याच क्षणी ती व्यक्ती त्याचा जगण्याचा मूलभूत अधिकार गमावते का? एखाद्या नागरिकास अटक केल्यानंतर त्याचा जगण्याचा अधिकार आस्थगित केला जाऊ शकतो का? सदरचे प्रश्न हे मानवी हक्क न्यायशास्त्राच्या कण्यालाच स्पर्श करणारे आहेत. खरे तर या प्रश्नांची उत्तरे ठामपणे 'नाही' असे असले पाहिजे. भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ द्वारे हमी दिलेले मौल्यवान हक्क हे कायद्याने परवानगी दिल्याप्रमाणे वाजवी निर्बंध घालून कायद्याने स्थापित केलेल्या प्रक्रियेशिवाय, दोष सिद्ध*

*न्यायधीन बंदी, स्थानबद्ध केलेले आणि कोठडीत असलेल्या इतर कैद्यांना नाकारता येत नाही. "*

७. याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांनी दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने *कोर्ट ऑन इट्स ओन मोशन द्वारा श्री अजय चौधरी विरुद्ध राज्य (२०१०) १७५ डी. एल. टी . ११० (डी. बी.)* मध्ये दिलेल्या न्यायनिर्णयाकडे आमचे लक्ष वेधले आहे.

८. यावर विचारले असता, भारत सरकारची बाजू मांडणारे विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्ता ( एडिशनल सॉलिसिटर जनरल ) श्री. तुषार मेहता यांनी सांगितले की, दिल्ली उच्च न्यायालयाने जारी केलेले निर्देश काही बदलांसह लागू केले जाऊ शकतात. विद्वान अतिरिक्त महान्यायअभिकर्तांने ( एडिशनल सॉलिसिटर जनरल ) अंतर्वादिक अर्जामध्ये सदरील रिट याचिकेत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ४ कडेही आमचे लक्ष वेधले आहे. हा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहेः -

*"४. गुन्हे आणि गुन्हेगारी मागोवा नेटवर्क आणि प्रणाली [क्राइम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क अँड सिस्टीम्स (सी. सी. टी. एन. एस.)'] या संरक्षणाखाली तक्रारी ऑनलाईन दाखल करण्यासाठी एक यंत्रणा स्थापन करण्यासाठी केंद्र सरकार सर्व राज्यांना पाठबळ देत आहे, असे आदरपूर्वक सादर करण्यात आले आहे. "*

९. श्री. सौरभ त्रिवेदी, उत्तराखंड राज्यातर्फे उपस्थित असलेले विद्वान वकिल यांनी असे सादर केले आहे की, लैंगिक गुन्हे तसेच लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ (पॉक्सो कायदा) अंतर्गत नोंदवलेल्या काही गुन्ह्यांच्या संदर्भात प्रथम खबरी अहवाल संकेतस्थळावर ठेवण्यात अडचणी येवू शकतात.

१०. मेघालय, मिझोराम आणि सिक्कीम या राज्यांतर्फे उपस्थित विद्वान वकिल अनुक्रमे श्री. रंजन मुखर्जी, श्री. शिखर गर्ग आणि श्री. युसूफ खान यांनी असे सादर केले आहे

की, बंडखोरी ही एक संवेदनशील बाब असेल आणि त्याशिवाय, २४ तासांच्या आत प्रथम खबरी अहवाल संकेतस्थळावर प्रसिद्ध (अपलोड) करणे या राज्यांसाठी कदाचित शक्य होणार नाही.

११. ओडिशा राज्यातर्फे उपस्थित असलेले विद्वान वकील श्री. उद्द्यम मुखर्जी यांनी असे सादर केले आहे की प्रकरण संवेदनशील असो वा नसो, न्यायालय म्हणू शकते की कोणतीही कारणे दिली जाऊ नयेत कारण प्रथम खबरी अहवाल (एफ.आई.आर) मधील आरोप स्वयंस्पष्ट आहेत.

१२. पक्षकारांच्या विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकल्यानंतर, आवश्यक निष्कर्ष नोंदवून त्यानंतर पुढील आदेश जारी करणे आम्हाला योग्य वाटते :-

(अ) आरोपी फौ.प्र.सं. च्या कलम २०७ अंतर्गत विहित पेक्षा लवकरच्या टप्प्यात प्रथम खबरी अहवालाची प्रत मिळविण्यासाठी पात्र आहे.

(ब) ज्या आरोपीला, त्याला फौजदारी खटल्यात अडकवले गेले आहे आणि त्याचे नाव प्रथम खबरी अहवालात समाविष्ट आहे असा संशय घेण्यास कारणे आहेत, तो न्यायालयाकडून प्रमाणित प्रत मिळवण्यासाठी देय असलेल्या शुल्काची रक्कम भरून संबंधित पोलिस अधिकाऱ्यापुढे किंवा पोलिस अधीक्षकांसमोर अशी प्रमाणित प्रत मंजूर करण्यासाठी त्याचा प्रतिनिधी/दलाल /पैरवीकार यांच्यामार्फत अर्ज सादर करू शकतो. असा अर्ज केल्यावर, त्याची प्रत चोवीस तासांच्या आत उपलब्ध करून दिली जाईल.

(क) आरोपीच्या वतीने प्रमाणित प्रतीसाठी दाखल केलेल्या अर्जावर पोलीस ठाण्याकडून संबंधित दंडाधिकारी किंवा कोणत्याही विशेष न्यायाधीशाकडे प्रथम खबरी अहवाल पाठवल्यानंतर, तो संबंधित न्यायालयाद्वारे दोन कामकाजाच्या दिवसांच्या आत दिला

जाईल. वरील निर्देशांचा फौ.प्र.सं. च्या कलम २०७ अंतर्गत असलेल्या वैधानिक आदेशाशी काहीही संबंध नाही.

(ड) लैंगिक गुन्हे, बंडखोरी, दहशतवाद आणि त्या श्रेणीतील गुन्हे, पोक्सो (लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायदा) कायद्यांतर्गत ६ गुन्हे आणि अशा इतर गुन्ह्यांसारखे गुन्हे संवेदनशील स्वरूपाचे नसल्यास प्रथम खबरी अहवालाच्या प्रती पोलीस संकेतस्थळावर प्रसिध्द (अपलोड) कराव्यात आणि असे संकेतस्थळ नसल्यास प्रथम खबरी अहवाल नोंदवल्यानंतर चोवीस तासांच्या आत राज्य सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द (अपलोड) कराव्यात जेणेकरून आरोपी किंवा त्याच्याशी संबंधित कोणतीही व्यक्ती प्रथम खबरी अहवाल प्राप्त (डाउनलोड) करू शकेल आणि त्याच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी कायद्यानुसार न्यायालयात योग्य अर्ज दाखल करू शकेल. येथे हे स्पष्ट केले जाऊ शकते की जर भौगोलिक स्थानामुळे तांत्रिक जोडणीची (कनेक्टिव्हिटीची) समस्या असेल किंवा इतर काही अपरिहार्य अडचण असेल तर वेळ ४८ तासांपर्यंत वाढवता येऊ शकतो. हे ४८ तास जास्तीत जास्त ७२ तासांपर्यंत वाढवले जाऊ शकतात आणि ते केवळ भौगोलिक स्थानामुळे तांत्रिक जोडणीच्या (कनेक्टिव्हिटीच्या) समस्यांशी संबंधित आहे.

(इ) प्रथम खबरी अहवालाची प्रत संकेतस्थळावर प्रसिद्ध (अपलोड) न करण्याचा निर्णय पोलीस उपअधीक्षक पदाच्या खाली असलेला अधिकारी किंवा समकक्ष पदावर असलेली कोणतीही व्यक्ती घेणार नाही. ज्या राज्यांमध्ये जिल्हा दंडाधिकाऱ्यांची भूमिका असेल, त्या राज्यांमध्ये ते उक्त अधिकारदेखील वापरू शकतात. संबंधित पोलीस अधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी घेतलेला निर्णय संबंधित अधिकारक्षेत्रातील दंडाधिकाऱ्यांना योग्य प्रकारे कळवला जाईल.

(फ) येथे आधी सांगितल्याप्रमाणे सक्षम प्राधिकरणाद्वारे संवेदनशील मानले जाऊ शकणाऱ्या इतर पैलूंव्यतिरिक्त 'संवेदनशील' या शब्दामध्ये प्रथम खबरी अहवालाच्या स्वरूपाशी संबंधित गोपनीयतेची संकल्पना देखील समाविष्ट असेल. संवेदनशील प्रकरणांच्या संदर्भात दिलेली उदाहरणे पूर्णपणे सचित्र आहेत आणि संपूर्ण नाहीत.

(छ) प्रथम खबरी अहवाल जर प्रसिद्ध न केल्यास, सीआरपीसीच्या कलम ४३८ अन्वये लाभ मिळविण्याचे साठी आधार मिळणार नाही, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता उरत नाही.

(ह) प्रकरणाच्या संवेदनशील स्वरूपा मुळे प्रथम खबरी अहवाल ची प्रत उपलब्ध न केल्यास, या कारवाईमुळे व्यथित झालेली व्यक्ती, आपली ओळख उघड केल्यानंतर, पोलीस अधीक्षक किंवा राज्यात समतुल्य पद धारण केलेल्या कोणत्याही व्यक्तीस निवेदन सादर करू शकते.पोलीस अधीक्षक तीन अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन करतील जी उक्त तक्रार हाताळेल.महानगरांच्या बाबतीत, जेथे आयुक्त आहेत, जर पोलीस आयुक्तांकडे निवेदन सादर केले गेले तर ते तीन अधिकाऱ्यांची समिती स्थापन करतील.अशा प्रकारे स्थापन केलेली समिती निवेदन प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत तक्रार हाताळेल आणि ती व्यथित व्यक्तीला कळवेल.

(i) वर उल्लेखिलेल्या सक्षम प्राधिकरणाने आजपासून आठ आठवड्यांच्या आत, वर निर्देशित केल्याप्रमाणे समितीची स्थापना करावी.

(ज) ज्या प्रकरणांमध्ये प्रथम खबरी अहवालच्या प्रती न देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्या प्रकरणाच्या संवेदनशील स्वरूपाच्या बाबतीत, आरोपी/त्याचा अधिकृत प्रतिनिधी/पैरवीकार यांना प्रमाणित प्रत देण्यासाठी न्यायालयासमोर अर्ज दाखल करणे

खुले असेल. ज्यावर प्रथम खबरी अहवालच्या पाठविला गेला आहे आणि तो अर्ज सादर केल्याच्या तीन दिवसांनंतर संबंधित न्यायालयाने तत्परतेने प्रदान केला पाहिजे.

(ट) सर्व राज्यांच्या संकेतस्थळावर प्रथम खबरी अहवाल आर. प्रसिद्ध करण्याचे निर्देश १५ नोव्हेंबर २०१६ पासून लागू केले जातील.

१३. या आदेशाची प्रत सर्व गृहसचिवांना आणि संबंधित राज्यांच्या पोलीस महासंचालकांना पाठवली जावी.

१४. त्यानुसार रिट याचिका निकाली काढण्यात आली आहे.

**न्या. [दीपक मिश्रा]**

**न्या. [सी. नागप्पन]**

**नवी दिल्ली**
**७ सप्टेंबर २०१६.**

**सुधारित**

**ITEM No.3** **COURT No. 4** **SECTION PIL (W)**

# भारताचे सर्वोच्च न्यायालय

## कार्यवाहीच्या नोंदी

**<u>रिट याचिका (फौजदारी) क्र. ६८/२०१६</u>**

**युथ बार असोसिएशन ऑफ इंडिया** **याचिकाकर्ते**

**विरुध**

**भारतीय संघ राज्य आणि इतर** **प्रतिवादी**

(प्रतिवादीचे नाव हटवण्यासाठी व ओ. टी. आणि कार्यालयीन अहवाल दाखल करण्यापासून सूट मिळण्यासाठी अर्ज )

दिनांक: ०७/०९/२०१६ रोजी सदर याचिका सुनावणीसाठी घेण्यात आली

**न्यायवृंद:**

माननीय न्यायमूर्ती श्री. दीपक मिश्रा

माननीय न्यायमूर्ती श्री. सी. नागप्पन

**याचिकाकर्त्यांसाठी:**

ॲड. श्री. सनप्रीत सिंग अजमानी,

ॲड. श्री. मनोहर प्रताप,

ॲड. श्रीमती आस्था वशिष्ठ

ॲड. श्री. पियुष भाटिया

ॲड. श्री. सौरभ पांडेय

ॲड. श्रीमती अंजली चौहान

ॲड. श्री. कुलदीप राय

ॲड. श्री. अनिश शर्मा

अॅड. श्री. अजीत शर्मा

श्रीमती मंजू जेटली , ए. ओ. आर. (AOR)

**प्रतिवादिंसाठी:**

श्री.  तुषार मेहता, ए. एस. जी.

अॅड. श्रीमती मंजुला गुप्ता

अॅड. श्री. जयंत मोहन

अॅड. श्री. बी.के. प्रसाद

**ओडिशा राज्यासाठी** :

अॅड. श्री. उद्यम मुखर्जी

श्री. कृष्णयन सेन, ए. ओ. आर (AOR)

अॅड. श्री. अतुल झा

अॅड. श्री. संदीप  झा

श्री. धर्मेंद्र कुमार सिन्हा, ए.ओ. आर (AOR)

श्री. जी. प्रकाश, ए. ओ. ओ. आर

अॅड. श्री. जॉयदीप मुजुमदार

श्री. पारिजात सिन्हा, ए. ओ. आर. (AOR)

अॅड. श्री. रोहित दत्ता

अॅड. श्रीमती रेशमी रिया सिन्हा

**मेघालय राज्यासाठी:**

श्री. रंजन मुखर्जी, ए.ओ.आर. (AOR)

अॅड. श्री. के.व्ही. खासलीन्गडोह

अॅड. श्री. सुभरो सन्याल

**मिझोराम राज्यासाठी** :

अॅड. श्री. शिखर गर्ग

अॅड. श्री. प्रज्ञान शर्मा

**उत्तराखंड राज्यासाठी**:

ॲड. श्री. सौरभ त्रिवेदी

ॲड. श्री. अविरल सक्सेना

**सिक्कीम राज्यासाठी**:

ॲड. श्री. युसूफ खान

ॲड. श्रीमती अरुणा माथूर

ॲड. श्री. अवनीश अर्पुथम

ॲड. श्रीमती अनुराधा अर्पुथम, अर्पुथम अरुणा व कं. साठी

श्री. नलीन कोहली, ए.ए.जी. (AAG)

ॲड. श्री. अंकित रॉय

श्री. रोहित के. सिंघ, ए.ओ.आर. (AOR)

श्री. अनिल कटियार, ए.ओ.आर. (AOR)

श्री. सौरभ त्रिवेदी, ए.ओ.आर. (AOR)

श्री. लग्नेश मिश्रा, ए.ओ.आर. (AOR)

ॲड. श्री. परीक्षित अंगडी

श्री. व्ही.एन. रघुपति, ए.ओ.आर. (AOR)

श्रीमती हेमंतीका वाही, ए.ओ.आर. (AOR)

ॲड. श्रीमती पूजा सिंघ

ॲड. श्रीमती आगम कौर

श्री. एडवर्ड बेल्हो, ए.ए.जी. (AAG)

ॲड. श्रीमती के. एनाटोली सिमा

ॲड. श्री. अमित कुमार सिंघ

ॲड. श्री. के. लुईकांग मिखाईल

ॲड. श्री. एलिक्स गंगमेई

ॲड. श्री. अंशुमन श्रीवास्तव

ॲड. श्री. अपूर्व भुमेशा

ॲड. श्री. सुनील फर्नांडिस

ॲड. श्री. निकेश त्यागी

वकिलांचे म्हणणे ऐकून न्यायालयाने पुढील आदेश दिला

न्यादेश जारी करा.

स्वाक्षरीत आदेशानुसार सदर  रिट याचिका निकाली काढण्यात येत आहे.

सर्व अंतर्वादिक अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(चेतन कुमार)** **(एच. एस.  पराशर)**

**कोर्ट मास्टर** **कोर्ट मास्टर**

(स्वाक्षरी केलेला आदेश संचिकेवर (फाईलवर) ठेवला आहे)

****

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

****